# MAHARASHTRA ACT No. XXIV OF 1993.

## THE CODE OF CRIMINAL PROCEDURE (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1973.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २८ जुलै १९९३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXIV OF 1993.

## AN ACT FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ५ ऑगस्ट १९९३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

# सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९७४ चा २. ज्याअर्थी, यात यापुढे नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९३ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४३८ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ४३८ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९७४ चा २.

अटकेची आशंका वाटणाऱ्या व्यक्तीला जामीन मंजूर करण्यासाठी निदेश.

"४३८.(१) बिनजामिनी अपराध केल्याच्या आरोपावरून आपणास अटक होईल असे जेव्हा कोणत्याही व्यक्तीला सकारण वाटत असेल तेव्हा, अशी अटक झाल्यास तिला जामिनावर सोडले जावे असा या कलमाखाली निदेश मिळविण्यासाठी ती व्यक्ती उच्च न्यायालयाकडे किंवा सत्र न्यायालयाकडे अर्ज करू शकेल ; आणि ते न्यायालय, इतर गोष्टींबरोबर, पुढील गोष्टी, म्हणजेच :—

(एक) अर्जदारास जाणवलेले आरोपाचे स्वरूप आणि महत्त्व किंवा गांभीर्य ;

(दोन) अर्जदाराने, त्यापूर्वी, कोणत्याही दखलपात्र अपराध्याच्या संबंधात, न्यायालयाकडून त्याला सिद्धापराधी ठरविण्यात आल्यानंतर मुदतीच्या कारावासाची शिक्षा भोगलेली आहे किंवा काय या वस्तुस्थितीसह अर्जदाराचे पूर्वचरित्र ;

(तीन) अशारीतीने अर्जदाराला अटक करवून त्याचा पाणउतारा करण्याचा किंवा त्याच्या लौकिकाला कलंक लावण्याचा आरोपाचा संभाव्य उद्देश; आणि

(चार) अर्जदाराला अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आल्यास तो न्यायापासून पळून जाण्याची शक्यता,

विचारात घेऊन एकतर अर्ज तत्काळ फेटाळून लावील किंवा अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासंबंधातील अंतरिम आदेश काढील :

परंतु, उच्च न्यायालयाने किंवा, यथास्थिती, सत्र न्यायालयाने या पोट-कलमाखाली कोणताही अंतरिम आदेश काढला नसेल किंवा अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासंबंधातील अर्ज फेटाळून लावला असेल त्याबाबतीत, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी, वॉरंट नसतानाही अशा अर्जात व्यक्त करण्यात आलेल्या आरोपाच्या आधारे, अर्जदाराला अटक करू शकेल.

(२) उच्च न्यायालयाला किंवा, यथास्थिति, सत्र न्यायालयाला, पोट-कलम (१) अन्वये अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासंबंधातील अंतरिम आदेश काढणे इष्ट वाटत असेल त्याबाबतीत, ते न्यायालय, अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासंबंधातील अर्जावर आदेश देण्यासाठी त्याची अंतिम सुनावणी ज्या दिनांकास करण्यात येणार असेल तो, न्यायालयाला योग्य वाटेल असा दिनांक त्यात दर्शवील; आणि न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर करणारा कोणताही आदेश काढला तर अशा आदेशात इतर गोष्टींबरोबर पुढील शर्तींचा अंतर्भाव करण्यात येईल :—

(एक) ज्या वेळी आवश्यक असेल त्या वेळी पोलीस अधिकाऱ्याकडून करण्यात येणाऱ्या पूसतपासासाठी अर्जदार स्वत: उपलब्ध राहील ;

(दोन) अर्जदार, त्याच्याविरुद्ध असलेल्या आरोपासंबंधातील वस्तुस्थितीची माहिती असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ती वस्तुस्थिती न्यायालयासमोर किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यासमोर उघड करण्यापासून तिला परावृत्त करण्यासाठी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या, कोणतेही प्रलोभन दाखविणार नाही, धमकी देणार नाही किंवा आश्वासन देणार नाही;

(तीन) अर्जदार न्यायालयाची पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज भारत सोडून जाणार नाही; आणि

(चार) जणूकाही जामीन कलम ४३७ अन्वये मंजूर करण्यात आला होता असे मानून त्या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये लादण्यात येतील अशा इतर शर्ती.

१७४ वा

(३) न्यायालयाने पोट-कलम (१) अन्वये अंतरिम आदेश दिला असेल त्या बाबतीत, ते, न्यायालयात त्या अर्जाची अंतिम सुनावणी करण्यात येईल त्यावेळी सरकारी वकिलास त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्याच्या हेतूने, सरकारी वकील व पोलीस आयुक्त, किंवा यथास्थिति, संबंधित पोलीस अधीक्षक यांच्यावर अशा आदेशाच्या प्रतीसह, सात दिवसांपेक्षा कमी दिवसांची नसेल अशी एक नोटीस बजावण्याची ताबडतोब व्यवस्था करील.

(४) सरकारी वकिलाने न्यायालयात केलेल्या अर्जावरून, न्यायाच्या हितांच्या दृष्टीने, अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या वेळी आणि न्यायालयाकडून अंतिम आदेश काढण्यात येईल त्यावेळी, अटकपूर्व जामीन मागणाऱ्या अर्जदाराची उपस्थिती आवश्यक आहे असे न्यायालयाला वाटत असेल तर त्या अर्जदाराची अशी उपस्थिती बंधनकारक असेल.

(५) न्यायालय, पोट-कलम (२) अन्वये अंतरिम आदेशात दर्शवलेल्या दिनांकास, सरकारी वकील व अर्जदार यांचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यांचे म्हणणे योग्यरीत्या विचारात घेतल्या-नंतर, ते, पोट-कलम (१) अन्वये काढलेला अंतरिम आदेश कायम करील, त्यात फेरबदल करील किंवा तो रद्द करील.".

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.